# प्रकरण — दोन

## मूल्य आणि शिक्षण यांचा परस्पर संबंध

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

# प्रकरण - २ रे

## मूल्य आणि शिक्षण यांचा परस्पर संबंध

२·१ प्रस्तावना

२·२ मूल्य - अर्थ आणि महत्व

२·३ मूल्य आणि शिक्षण यांचा परस्पर संबंध

२·४ मूल्यांचे अध्यापन

२·५ समारोप

=0=0=0=0=0=

# प्रकरण - २ रे

## मूल्य आणि शिक्षण यांचा परस्पर संबंध

### २.१ प्रस्तावना :

विद्यार्थ्यांवर समाजातील विविध घटकांकडून संस्कार होत असतात. यामध्ये कुटुंब, शाळा, समाज, मित्र मंडळ, संपर्क साधने इ. घटकांचा समावेश होतो. यातून कांही संस्कार आपोआप होतात. तर कांही संस्कार जाणीवपूर्वक केले जातात. या संस्कारामध्ये मूल्यांना महत्वाचे स्थान आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांवर जे संस्कार केले जातात ते मूल्यांना अनुसरून केले जातात.

शाळामध्ये विद्यार्थ्यांवर जे संस्कार केले जातात ते जाणीवपूर्वक असतात. हे संस्कार करणारा शिक्षक हा महत्वाचा घटक आहे. म्हणून शिक्षकास मूल्य म्हणजे नेमके काय ? माहिती असणे आवश्यक आहे. त्यांच्यावर मूल्यांचा संस्कार का करावयाचे ? मूल्यांचे व्यक्तींच्या जीवनात कोणते स्थान आहे ? मूल्यांचे महत्वा कोणते ? हे माहित असणे आवश्यक आहे.

प्रस्तुत प्रकरणामध्ये मूल्यांचा नेमका अर्थ स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच मूल्यांचे व्यक्तींच्या जीवनात कोणते महत्वाचे स्थान आहे तेही स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचबरोबर ही मूल्ये रुजवावयाची म्हणजे नेमके काय करावयाचे हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. ही मूल्ये रुजवण्याचे कार्य शिक्षक विविध विषयातून आपल्या

अध्यापनाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये करत असतो. म्हणजेच शिक्षक अध्यापनाद्वारे नैतिक मूल्ये विद्यार्थ्यांत संक्रमित करत असतात. त्यामुळे मूल्य संक्रमणाच्या दृष्टीने अध्यापन कसे केले पाहिजे ? मूल्यशिक्षणाच्या अध्यापन पध्दती कोणत्या आहेत ? तेही स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच मूल्य आणि शिक्षण यांचा परस्पर संबंध स्पष्ट केलेला आहे.

थोडक्यात सदर प्रकरणामध्ये मूल्य म्हणजे काय ? त्याचे मानवी जीवनातील महत्व, मानवी जीवनावर प्रभाव टाकणारी विविध मूल्ये, त्या मूल्यांचे अध्यापन कसे करावयाचे याचा उहापोह केलेला आहे.

## २.२ मूल्य - अर्थ आणि महत्व :

सामाजिक वातावरणात व्यक्ती घडत असते आणि काही श्रेष्ठ, जेष्ठ व्यक्ती समाजालाही वळण देत असतात. हे घडवणं, वळण देणं परस्पर आंतरक्रियेतून चालू असते. समाजाच्या पाठीमागे मानवी संस्कृती आणि मानवी इतिहास असतो. इतिहास, संस्कृतीच्या अवलोकनातून परिशीलनातून माणसाने समाजामध्ये वागावे कसे, चालावे कसे, बोलावे कसे, आपले वर्तन ठेवावे कसे या संबंधी समाज काही आडाखे घालत असतो. मानवी जीवनातील "सत्" चा विचार करुन प्रत्येक व्यक्तीने हे आडाखे पाळावेत असे समाज अपेक्षित करतो. याचा अर्थ असा होतोकी, मूल्यांचा विचार करताना समाजाचा विचार करावा लागतो. वरील गोष्टींचा विचार करुन मूल्यांची व्याख्या खालील प्रमाणे करता येईल.

> " मनुष्याच्या व्यक्तिमत्वातील ज्या ज्या गोष्टींना समाजामध्ये मूल्य आहे ती गोष्ट म्हणजे " मूल्य " होय. "

अर्थशास्त्रीय दृष्टिकोनातून मूल्य ही संज्ञा वस्तूची किंमत या अर्थाने वापरलेली असते. साहित्यशास्त्रीय दृष्टिकोणातून "मूल्य" हा शब्द समाजकल्याण अथवा मानवाचे हित या अर्थापर्यंत मर्यादित नाही. येथे या पेक्षा व्यापक अर्थाने मूल्याकडे पाहिले जाते. मानवाखेरीज इतर जीवसृष्टी, निसर्गातील सर्व घटकांचे हित, कल्याण हा अर्थ अभिप्रेत आहे.

मानव हा आयुष्यामध्ये अनुभवाची किंवा पदार्थांची निवड करत असतो. ती म्हणजे चांगले अथवा वाईट, सुष्ट किंवा दुष्ट, प्रिय अथवा अप्रिय, म्हणजे हे अनुभव अथवा पदार्थांची व्यक्तीची ही निवड चांगल्या अथवा वाईट या निकषावर होते. अनुभवाचा अथवा पदार्थांचा चांगला वाईटपणा म्हणजेच त्याचे मूल्य होय.[१]

" मूल्य म्हणजे पदार्थांची आस्वादात्मक, आस्वाद्यमानता, रसवत्ता अथवा रमणीयता होय."

उदा. या फुलाला अमुक इतक्या पाकळ्या आहेत. त्याचे वजन इतके आहे. त्याची रंगछटा अमुक आहे . . . . . अशा त-हेची आणखी विधाने करून त्या फुलाच्या संपूर्ण तथ्यांचे निवेदन करता येईल. पण या यथातथ्य निवेदनानंतर त्या फुलाचे मूल्य अथवा आस्वाद्यमानता ही गोष्ट निराळीच राहते. मूल्य हे प्राप्तव्य आहे. कारण ते आस्वाद्य आहे. उष्णतामान हे ज्या प्रमाणे उष्णता आणि शीतलता या दोहोंचे मापन असते, त्याप्रमाणे मूल्यानुभवात शुभतेचा व अशुभतेचा, धनमूल्यांचा व ऋण मूल्यांचा समावेश होतो.

आपल्या तथ्य अनुभवातून भौतिक, रसायन यासारखी वर्णनात्मक शास्त्रे निर्माण होतात. नीती, धर्म, कला, राज्यशासन इत्यादि

जीवनाच्या दालनातून मूल्यानुभवाचे संघटन होते. त्या त्या संघटीत मूल्यानुभवाची नीतिशास्त्र, राज्यशास्त्र, इत्यादी स्वतंत्र शास्त्रे आहेत, ती आदर्शात्मक शास्त्रे आहेत. सर्व आदर्शात्मक शास्त्रांच्या मुळाशी असलेली जी मूल्य संकल्पना, तिचा व्यापकपणे विचार करणारे विशेष शास्त्र म्हणजे मूल्यशास्त्र होय.

माणसाचे वर्तन कसे असावे यासंबंधी समाजाने काही आदर्श निर्माण केलेले असतात. हे आदर्श म्हणजे मूल्य शास्त्र होय.

मूल्य शब्दाने मनोधारणेची विशिष्ट स्थिती वा घडण दर्शविली जाते. मनाच्या या विशिष्ट घडणीवरच व्यक्तीचे समाजातील वर्तन अवलंबून असते. इतरांशी सद्भावनेने वागण्यास व्यक्तीला ज्या वृत्तींची मदत होते ते नैतिक मूल्य होय.[१] ज्या मनोधारणेच्या विशिष्टय स्थितीमुळे किंवा घडणीमुळे किंवा वृत्तीमुळे आपले इतरांच्या बाबतीत जे प्रत्यक्ष वर्तन घडते त्याला नैतिक गुण म्हणतात. नैतिक गुण म्हणजेच मूल्यांचे प्रत्यक्ष व्यवहारातील प्रकटीकरण होय. सामाजिक हित साधण्यासाठी स्वतःच्या इच्छा व प्रवृत्ती यावर बंधन घालण्याची प्रेरणा ज्या गुणामुळे मिळते ते नैतिक गुण होत.

उदा. निष्पृहता हे मूल्य आहे. पण आपण जेंव्हा रामशास्त्री प्रभुणे निष्पृह होता असे म्हणतो तेंव्हा आपल्याला असे म्हणावयाचे असते की, त्यांच्या मनाची घडणच निष्पृह बोलण्याची होती.

आदर, आतिथ्य ही मूल्ये झाली. परंतु आदरपूर्णवागणे अथवा आतिथ्य करणे हा गुण झाला. हे गुण व्यक्तीमध्ये जन्मजात नसतात. हे उघड आहे. मूल्ये केवळ बौध्दिक स्तरावर शिकवून चालणार नाहीत. तर

त्या मूल्यांचा, बौद्धिक, भावनिक व क्रियात्मक स्तरावर स्विकार केला गेला पाहिजे• त्यामुळे मूल्य शिक्षणाच्या संदर्भात शिक्षकाची जबाबदारी वाढते• कारण शिक्षणाद्वारेच आपण व्यक्तीला गुणसंपन्न बनवू शकतो•

" मूल्य " या शब्दाला इंग्रजी मध्ये 'Value' असा प्रतिशब्द आहे• 'Value' या संज्ञेचा अर्थ खालील प्रमाणे आहे•

**'Belief about what is desirable or undesirable, values reflect the culture of society and if the individual accepts a value for him/herself it may become a goal.'**[3]

येथे " मूल्य शिक्षण " हा शब्द सुसंस्कार या शब्दाच्या अर्थाशी निगडीत आहे• " मूल्य " म्हणजे मानवी जीवनातील " सत् " ची निर्मिती होय, म्हणून मूल्यशिक्षण म्हणजे सुसंस्काराचे रोपण मानावे लागते• मानवी जीवनाला आवश्यक असणा-या सत्गुणांचे रोपण करण्यासाठी त्या स्वरूपाचे संस्कार मुलांच्यावर करावे लागतात• हे संस्कार शिक्षणानेच शक्य होता आहेत• म्हणून मूल्यशिक्षण म्हणजे सुसंस्कार असे म्हटले आहे• मानवी संस्कृतीतील सत्गुणांनी " मूल्य " ही संज्ञा निर्माण केलेली आहे• समूहमनाचा, समूहजीवनाचा, व्यक्तीच्या सामाजिक व्यवहाराच्या आशा- आकांक्षेचा विचार अभिप्रेत आहे• सामाजिक जीवनात व्यक्तीवर्तन, व्यवहार जीवन कसे असावे याचे आदर्शीकरण " मूल्य " या संज्ञेमध्ये अपेक्षित आहे•

मूल्य आणि समाज, मूल्य आणि इतिहास, मूल्य आणि संस्कृती, मूल्य व व्यक्ती यांचा परस्पर संबंध वरील स्पष्टीकरणाच्या आधारे लक्षात येतो• म्हणूनच ज्यावेळी समाजामध्ये मूल्यांचा -हास होत चालला आहे असे

म्हटले जाते. तेंव्हा ते आधार पटवून देण्यासाठी लोक इतिहासाचा आणि इतिहासामध्ये असलेल्या संस्कृतीचा आधार घेताना दिसतात.

" नैतिक, बौध्दिक अथवा सौंदर्यविषयक दृष्टीकोनातून आपल्याला ज्या बद्दलची पसंती जाणवते त्यालाच मूल्य म्हणता येईल." [४]

असे लीला पाटील यांना वाटते. अर्थात ही त्यांची व्याख्या व्यक्तिमत्वाच्या पसंती, नापसंतीच्या दृष्टीकोनातून केलेली जाणवते. तरीही त्यांनी मूल्यांमधील सामाजिक जाणीव अपेक्षिलेली दिसते.

एन.सी.इ.आर.टी ने प्रसिध्द केलेल्या "व्हल्यूज ॲण्ड स्कूल" या पुस्तिकेत " मूल्य " या संज्ञेची पुढील प्रमाणे व्याख्या केलेली आहे.

"A value is what is desired or what is sought. Values may be oferationally conceived as those guiding principles of life which are conducive to one's physical and mental health as well as to social walfare and adjustment and which are in tune with one's culture."[5]

ज्यांची आकांक्षा धरावी अथवा पाठपुरावा करावा अशी गोष्ट म्हणजे मूल्य. परंपरेला धरून एखाद्या शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्याला तसेच समाजहिताला आणि समायोजनला उपयुक्त ठरणारी मार्गदर्शक जीवनसत्वे म्हणजे मूल्ये होय, अशी मूल्यांची व्यावहारिक व्याख्या करता येईल. जीवन व मूल्ये यांचा घनिष्ठ संबंध आहे. हे आपल्या लक्षात येईल. कारण जीवनास अर्थपूर्णता यावयाची असेल तर व्यक्तीने आपल्या जीवनात जीवनमूल्यांचा स्विकार केला पाहिजे.

शैक्षणिक तत्वज्ञानाच्या संदर्भात " मूल्य " ह्या संज्ञेने स्वयंसिध्द



A

आणि इष्ट अशा ध्येयांचा आणि आदर्शांचा निर्देश केला जातो. ही ध्येये किंवा आदर्श साध्य झाली असता किंवा साध्य करण्याच्या प्रयत्नातदेखील आपल्या स्वभावातील आपल्याला अत्युच्च वाटणा-या गोष्टींच्या परिपूर्तीची सखोल अशी जाणीव जागृत करतात. सत्य, शिव आणि सौंदर्य ही जीवनाची सर्वोच्च मूल्ये आहेत. असे म्हटले जाते. त्यावेळेला त्याचा नेमका अर्थ काय असतो. या विषयी आपल्या सर्वांच्यातच साधारण अशी एक समजूत असते, ही मूल्ये मूलत:च स्वयसिध्द असून साध्याच्या स्वरूपात असतात. ती अत्यंत इष्ट अशी ध्येये वा आदर्श वा साध्ये मानली जातात.

प्रत्येक समाजाचे त्याचप्रमाणे त्या समाजातील व्यक्तीचे काही आदर्श असतात, काही इप्सिते असतात त्यांना त्या समाजाची मूल्ये असे म्हणता येईल. दुस-या एका व्याख्येवरून मनुष्याच्या जीवनातील आवड निवडी वा प्रभाव गाजवून त्याच्या वर्तनाचे नियंत्रण करणारे घटक म्हणजे मूल्य होय. या व्याख्येनुसार मूल्ये म्हणजे मनुष्याच्या कृतीची मूर्त स्वरूपातील अंतिम उद्दिष्टे नाहीत, तर ही अंतिम उद्दिष्टे निवडण्याचे निकष आहेत असे मानणे क्रमप्राप्त आहे.

आपण मूल्य ही संज्ञा मानवी जीवनाच्या संदर्भातच वापरतो. पशुजीवनामध्ये " मूल्ये " असतात असे मानण्यास जागा नाही. मानवी जीवन आणि पशुजीवन यामधील हा महत्वाचा फरक आहे. त्यामुळेच आपण मानवी जीवन पशुजीवनाहून वेगळे आणि आगळे आहे असे मानतो. तेंव्हा ज्या गोष्टीमुळे,आदर्शामुळे वा तत्वांमुळे मानवी जीवन अर्थपूर्ण झाले आहे. त्या गोष्टींना आदर्शांना किंवा तत्वांना आपल्याला मूल्य ही संज्ञा लावता येईल. तेंव्हा अशा गोष्टी कोणत्या की, ज्यामुळे

मानवी जीवन कृतार्थ झाले असे म्हणता येईल. त्यांचा शोध घेतला पाहिजे.

ज्यामुळे मनुष्यजीवन अर्थपूर्ण होते अशी जीवन विषयक तत्वे, साहित्य, संगीत कला अशा गोष्टी " माणूस " म्हणून म्हणवून घेण्यास योग्य असे गुणविशेष यांना मानवी मूल्ये असे यथार्थपणे संबोधता येईल.[१]

ज्या मूल्यांमुळे मानवी वर्तन व जीवन संपन्न आणि सुसंस्कृत बनते त्या मूल्यानाच आध्यात्मिक व नैतिक मूल्ये व म्हणता येईल. नैतिक सुव्यवस्थेशिवाय कोणताही समाज स्थिर व दृढमूल होऊ शकणार नाही. नैतिक व आध्यात्मिक मूल्याशिवाय सामाजिक जीवनाला आधारच मिळणार नाही, समाजाची घडण जसजशी अधिकाधिक गुंतागुंतीची बनत जाते. समाजातील घटकांच्या परस्पर सहकार्यावर जेंव्हा सर्वांचे कल्याण अवलंबून असते, तेंव्हा मूल्यांचा स्विकार अपरिहार्य आहे.

सामाजिक मूल्ये ही संकल्पना फारच व्यापक व सापेक्ष स्वरूपाची आहे. सामाजिक दृष्टया चांगले व वाईट हे ठरविण्यासाठी सभोवतालच्या परिस्थितीचा विचार करावा लागतो. " चांगले " मूल्य हे आपण कसे ठरवणार ? चांगले म्हणजे सभोवतालच्या सामाजिक परिस्थितीच्यादृष्टीने योग्य ते चांगले होय. कारण समाजाच्या अपेक्षेनुसार जे वर्तन योग्य ते चांगले होय. त्यालाच आपण सामाजिक मूल्ये या सदरात मोजतो. "वाईट" हे मूल्य सुध्दा स्थल, काल, व्यक्ती, परिस्थितीनुसार बदलत असते. उदा. भारतासारख्या देशात सार्वजनिक ठिकाणी स्वतःच्या स्त्रीचे देखिल चुंबन घेणे हे सामाजिक दृष्टीने अयोग्य वर्तन ठरते. तर प्रगत अशा पाश्चात्य देशात सार्वजनिक ठिकाणी परस्त्रीचे देखिल अभिवादनाच्या स्वरूपात चुंबन घेणे अयोग्य वर्तन मानले जात नाही. या उदाहरणावरून

मूल्यांचा संदर्भ कसा बदलत जातो ते समजून येईल.

सामाजिक मूल्ये ही व्यक्तीच्या बाहय वर्तनावरून निरीक्षण करून ठरविली जातात. बाहय वर्तनात कृती झालेली असते. त्यामुळे आपणास वर्तनाचे निरीक्षण करता येते. नैतिकदृष्टया व सामाजिकदृष्टया त्या व्यक्तीचे वर्तन योग्य आहे किंवा नाही हे सामाजिक व नैतिक मूल्यांच्या प्रमाणाद्वारे समाज ठरवत असतो.

कित्येक वेळा साहित्यामध्ये वर्णन केलेले आचरण हे घटना, व्यक्ती, अथवा नीतिसंमत असत नाहीत. तरी सुध्दा त्यांचे स्वत:चे असे मूल्य असते.[७]

दुष्यंताचे शकुंतलेला सोडणे ही चांगली गोष्ट नाही. परंतु या घटनेमुळेच मुळ शाकुंतलमध्ये करुणरस निर्माण होतो. शाकुंतलमधील घटनेच्या वर्णनातील विशेषतेनुसार तीच गोष्ट प्रेक्षकांच्या मनात त्याच क्षणी ते अनीतिमान नाही अथवा स्वार्थाने ते पाप नाही याचा विश्वास जागवते. इथे शिव व सुंदरतेचे द्वंद्व सुरु होते. ते सत्य, शिव, सुंदर या तिन्ही मूल्यांना एकाच सत्तेचे तीन पदर् मानतात. तसेच सौंदर्यवादी सौंदर्याला अंतीम मूल्य मानतात. तर नीति प्रचारक " शिव " ला आणि वास्तववादी " सत्य " ला मानतात.

मनुष्याची स्वत:ची काही मूल्ये असतात. परंतु मनुष्य हा एक मोठया समाजाचा घटक आहे. या समाजामध्ये कुटुंब, नगर, प्रदेश, राज्य, विश्व यांचा समावेश होतो. त्यामुळे त्यांचे विचार, कल्पना, कार्य इत्यादी दृष्टीने मूल्यांचा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे.

"कौटुंबिक मूल्ये" ही व्यक्तीच्या व्यक्तित्व निर्मितीस साधक अथवा बाधक असू शकतात. ही मूल्ये त्यांची साहित्यिक अभिरुची, शिक्षण, संस्कार इत्यादी निश्चित करतात. यातून व्यक्ती एक विशिष्ट प्रकारची मूल्य संहिता तयार करते. अशा मूल्यांचा संघर्ष कुटुंबापेक्षा विस्ताराने मोठ्या अशा नगर, समाज, राष्ट्र, जात, भाषा अशा अनेक प्रकारच्या गटाच्या अथवा संस्थेच्या मूल्यांशी होतो. यातूनच व्यक्तीचे व्यक्तित्व बनले जाते, तर कधी बिघडले जाते. या सर्व विविध मूल्यानंतर सुद्धा एक महत्वाचे मूल्य आहे. ते म्हणजे मानवीय मूल्य अथवा मानवता मूल्य आहे. कारण हे मानवता मूल्य हेच साहित्यात विवेक वाढविण्याच्या दृष्टीने सहाय्यक असते.

" सामाजिक मूल्य " हे एका विशिष्ट प्रकारच्या अर्थशास्त्रीय राजनैतिक दृष्टीने वापरले जाते. कारण शेक्सपियर अथवा कालिदास यांच्या नाटकाचे सामाजिक मूल्य कमी आहे असे मानतात. तरी सुद्धा त्यामध्ये साहित्यिक मूल्य अधिक असल्याने त्यांना श्रेष्ठ साहित्यिक मानले जाते. थोडक्यात असे म्हणता येईल की, जी मूल्ये समाज मूल्यांच्या विरोधी न होता त्यांना पोषक असलेल्या व्यक्तीमध्येच असतात व तीच खरी मानवतावादी मूल्ये असतात.

प्राचार्य राम शेवाळकरांच्या मते सध्याची सामाजिक चिंताजनक होण्याचे कारण सर्व जीवनमूल्ये आज लोप पावत चालली आहेत. धर्म समाजाची धारणा करतो व समाजाची वाटचाल निकोप व्हावी व त्याला आपला सर्वांगीण विकास करून घेता यावा, यासाठी धर्मतत्वांचा आधार त्याकाळी अनिवार्य ठरविला गेला होता. धर्मामध्ये समाजोन्नत्तीसाठी आवश्यक असणारी नैतिक मूल्ये व आचारसंहिता समाविष्ट होती. आज

समाजातील धर्माचे प्रामाण्य संशयास्पद झाले आहे. त्यामुळे समाजाच्या निरामय प्रगतीसाठी इष्ट ठरलेली मूल्ये आवश्यक वाटेनाशी झाली आहेत. त्यामुळे समाजाचे स्वरूप अत्यंत अव्यवस्थित, विस्कळीत व कणाहीन झाले आहे.

मूल्यांचा असा सार्वभौम वचक नाहीसा झाल्यामुळे समाज अनिर्बंध व सैल होत गेला. त्यामुळे झालेली हानी लक्षात आल्यानंतर मूल्यांची पुन्हा गरज भासू लागली. आजच्या भरकटलेल्या समाजात ही मूल्ये पुन्हा कशी रुजवता येतील ? संत साहित्य ही जबाबदारी पत्करून, पेलून पार पाडू शकेल. कारण संत साहित्यातील प्रवृत्तीपर असा जो भाग आहे त्यात मूल्यांचे संकीर्तन झाले आहे. उदा.

जोडोनीयाधर्न उत्तम व्यवहारे ।

संत तुकारामानी आपल्या अभंगामध्ये यासारखी अनेक मूल्ये समाजाला सांगितलेली आहेत. आणि म्हणून सध्याच्या समाजामध्ये समाजाच्या पुनरुत्थानासाठी मूल्यांचे पुनरुज्जीवन आवश्यक आहे. गीतेमधील सर्व प्रसिद्ध ऐश्वर्य आश्वासनामागे हाच दृष्टिकोन आहे.

ज्ञानेश्वर, रामदास, तुकाराम, एकनाथ या व इतर सर्वांनी माणूस सुधारावा, माणसातलं देवपण जागं करावं यासाठी आयुष्यभर प्रयत्न केले. " पापाची वासना नको दाऊ डोळा, किंवा निंदेचे श्रवण नको माझ्या कानी तसेच " अपवित्र वाणी नको माझ्या मुखा" हे थोडक्यात लोकांना सांगितले. मानवजातीला प्रकाश दाखविणारी चिरंतन मूल्ये संतानी आपल्या रचनेत सांगितली आहेत.

मूल्यांच्या विविध व्याख्यावरून मूल्यांचा संबंध व्यक्तिच्या आवडी, निवडी, वृत्ती, त्यांचे मानसिक स्वास्थ्य, समाजहित, त्यांच्यातील विविध गुण इत्यादी बाबींशी आहे• हे सर्व घटक व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाशी संबंधित असल्याने यावरूनच व्यक्तीचा समाजातील दर्जा ठरत असतो• त्यामुळे व्यक्तिच्या जीवनात मूल्यांना अनन्य साधारण महत्व आहे•

## २•३ मूल्य आणि शिक्षण यांचा परस्पर संबंध :

व्यक्तीचे जीवन मूल्यांनीयुक्त करावयाचे असेल तर ती जबाबदारी प्रामुख्याने शिक्षणावर येते• कारण शिक्षणाद्वारेच विविध प्रकारची मूल्ये व्यक्तीमध्ये रूजवावी लागतात• मनुष्याला सद्वर्तनी करणे हे मूल्यसंक्रमणाचे महत्वाचे उद्दिष्ट लक्षात घेतल्यानंतर " शिक्षण म्हणजे वर्तनबदल " या शिक्षणाच्या व्याख्येकडे लक्ष जाते आणि मूल्य आणि शिक्षण यांचा अन्योन्य संबंध लक्षात येतो•

"प्लेटो " च्या मते " सत्यं, शिवं, सुंदर " ही जीवनाची अंतिम मूल्ये• ती समजण्याची व अनुभवण्याची पात्रता मनुष्याला आणून देणारे ते खरे शिक्षण होय"• याचाच अर्थ त्यांच्या मते मुलांमधील उपजत प्रवृत्तीचे उदात्तीकरण करून त्यांना चांगली माणसे बनवणे हे शिक्षणाचे कार्य होय•

कोमिनियस यांनी, " शिक्षण म्हणजे संपूर्ण मानव्याचा विकास होय" असे म्हटले आहे•

फ्रेडिक फ्रोबेल, " श्रद्धा, पावित्र्य आणि सातत्य यांनी युक्त

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

असे जीवन निर्माण करणे " हा शिक्षणाचा हेतू मानला आहे.

जॉन रस्किन यांनी, " ज्ञान म्हणजे शिक्षण नव्हे, जे लोकांना अज्ञात आहे ते शिकविणे म्हणजे शिक्षण नव्हे, तर ज्यांना वागता येत नाही, त्यांना नीट वागावयास शिकविणे " असे म्हटले आहे.

मूल्ये ही मानवाने जतन करून ठेवायची ध्येये असून तो ती अपेक्षित मूल्ये मानतो व जतन करतो. यामध्ये भौतिक वस्तूही असतील. उदा.घर, संपत्ती, धान्य इ. आणि अमूर्त आदर्शांच्या आणि गुणांच्या जसे सत्य, सुख, शांतता या बाबी असतील. आपल्या विचारांना, भावनांना, आणि कृतीला चांगल्या जीवनाच्या संकल्पना अपेक्षित असतील त्यानुसार शिकणा-याच्या वर्तनात बदल करणे हे शिक्षणाची प्रक्रिया आहे. शिक्षण म्हणजे मुलांचे ज्ञान, कौशल्ये, वृत्ती, मूल्ये आणि वर्तन रचना, ज्या आपणास व्यक्ती म्हणून आणि समाजाचा घटक म्हणून संयुक्तिक वाटतील ते होय.

शिक्षणाची मानवी विकासाची वेगळी ध्येये व उद्दिष्टे म्हणजे सृजनशीलता, सामाजिक न्याय, राष्ट्रीय एकता, शास्त्रीय दृष्टी आणि मनाचे व आत्म्याचे स्वातंत्र्य, समाजवाद, सर्वधर्मसमभाव, लोकशाही या मानवी मूल्यांना वाहून घेणे असून ती चांगल्या जीवनसंकल्पनांची शैक्षणिक अभिव्यक्तीच होय. ह्या उद्दिष्टाप्रत पोहचण्यास आपण अभ्यासक्रम आखतो, अभ्यासक्रम म्हणजे ज्ञानाचा, कौशल्याचा आणि वृत्तीचा सुसंघटीत नियोजनबध्द समुच्चय होय. जो आपल्या सांस्कृतिक वारशातून प्राप्त झालेला असतो. शिक्षण हे उद्दिष्टातून, अभ्यासक्रमातून आणि पध्दतीतून मूल्याशी जोडलेले असते. इतकेच नव्हे तर शिक्षणाद्वारे, मानवसमाज आपल्या मूल्यांचा ठेवा मिळवितो, जतन करतो, वाढवितो.[८]

आधुनिक युग हे विज्ञानाचे युग आहे. जसजशी विज्ञानामध्ये प्रगती होत आहे. तसतसा मनुष्य आपली नैतिकता, परस्परामधील संबंध विसरत चालला व स्वत:शी केंद्रीत होवून स्वत:साठीच सर्वकाही करु लागला. त्याने निरनिराळे शोध लावले. त्यातून त्याला भौतिक सुखे मिळू लागली. परंतु हे करीत असताना तो जीवनाची खरी शांतता, सुख, समाधान कशात आहे हे तो विसरला त्याने वेगवेगळ्या समस्या निर्माण करुन ठेवल्या. उदा. राजकीय, आर्थिक मक्तेदारी, या समस्यांचा परिणाम म्हणून समाजामध्ये घटस्फोट, आत्महत्या, अतिरेकी कारवाया याचे प्रमाण वाढत गेले. यावरुन असे सिध्द होते की, मनुष्याला मानसिक सुख आणि समाधान केवळ पैसा किंवा वस्तुरुप साधन देउ शकत नाही.

वैज्ञानिक दृष्टिकोन हा कधीही श्रेष्ठच आहे. परंतु वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अर्थ नीट समजला नसल्याने त्याचा अर्थ आधुनिक गोष्टीचा स्विकार व परंपरागत गोष्टीचा विसर असा विचार केला गेला. याचा परिणाम म्हणून मानसाने परंपरागत संस्कृती, धर्म याचा त्याग केला ( यातूनच वरील समस्या निर्माण झाल्या, जसजसा तंत्रज्ञानाचा विकास होत गेला. तस तसे कारखानदारीचे प्रमाण वाढले. यातूनच लोकांचे स्थलांतर होउ लागले. स्थलांतरीत लोकांची एक वेगळीच संस्कृती तयार होउ लागली. अशा परिस्थितीमध्ये आधुनिक युगात मूल्यशिक्षणाला महत्व आलेले आहे.[१]

आपल्या शिक्षण प्रणालीतील आणि समाजातील ब-याचशा घातकी आणि दुष्ट प्रवृत्ती नाहीशा करावयाच्या असतील तर मूल्य शिक्षणाला पर्याय नाही. विकसीत ज्ञानविज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे माणसाच्या हाती आलेले सामर्थ्य यामुळे सारी मानवजात विनाशाच्या

वाटेने तर वाटचाल करीत नाही ना अशी दुस-या महायुद्धातील हिरोशिमा आणि नागासकी येथील भीषण संहारामुळे एकप्रकारची साधारण भीती आज सर्वांच्याच मनात वास करीत आहे. सारी मानवजात एक प्रकारच्या असुरक्षिततेच्या, भयाच्या आवरणाखाली वावरत असताना दिसते. मानवजातीला भेडसावणारी ही असुरक्षितता नाहीशी करुन पृथ्वीचे नंदनवन बनवायचे असेल तर मूल्यशिक्षण केवळ आवश्यकच नाही तर सर्वच राष्ट्रांच्या शिक्षणप्रणालीचे अविभाज्य अंग बानणे आवश्यक आहे.

मूल्ये ही मानवी विकास आणि प्रगतीची निर्देशक असल्यामुळे आणि शिक्षण हे मानवी विकासाचे एक महत्त्वपूर्ण साधन असल्यामुळे दोघेही एकमेकांशी निगडीत आहेत. येथे साधन आणि साध्य दोघांचीही शुचिता दिसून येते. तेव्हा पवित्र अशा शिक्षणाच्या अमूल्य अशा मूल्यांची प्राप्ती करुन स्वतःचा आणि त्याच बरोबर समाजाचा, राष्ट्राचा आणि संबंध मानवजातीचा विकास साधायला हवा.[१०]

मूल्य शिक्षणामध्ये नैतिक शिक्षण, धार्मिक शिक्षण, आध्यात्मिक शिक्षण इत्यादी शिक्षण शाखांचा समावेश होतो. गुरुकूल पध्दतीच्या शिक्षण प्रणाली पासून १९८६ च्या नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणापर्यंत सर्वच शैक्षणिक आयोगानी व शिक्षण समित्यांनी, परिषदांनी मूल्यशिक्षणाचा पुरस्कार केलेला आहे.

### आध्यात्मवादाची मूल्यविषयक भूमिका :

अध्यात्मवादाच्या दृष्टीने जीवनमूल्ये म्हणजे, " सत्यं, शिवं, सुंदरम् " ही आहेत. मानवी जीवन सुखी करावयाचे असेल तर माणसाने

आपले आचारण वरील अंतिम जीवनमूल्यांना अनुलक्षून करावयास पाहिजे• ह्या मूल्यांच्या आधारेच आत्मसाक्षात्काराचा अनुभव येतो• या चिरंतन मूल्यांच्या प्रकटीकरणासाठी नीतीमय जीवन (नैतिक मूल्य), कल्याणकारी वर्तन (शिव) , सौंदर्याभिरुची (सुंदरम्) अशी मूल्ये गृहीत धरली गेली• नैतिक मूल्य संवर्धनासाठी म्हणून घालून दिलेल्या धर्माचरणामध्ये आचार शुद्धता, विचार शुद्धता, उच्चार शुद्धता ही देखील स्वतंत्र मूल्ये मानली गेली• अध्यात्मवादात धार्मिक, समाजिक, नैतिक व सौंदर्यात्मक मूल्यांचा अंतर्भाव असतो• अध्यात्मवादाला आदर्शवाद असे संबोधतात•

## निसर्गवादाची मूल्य विषयक भूमिका :

रूसोच्या मताप्रमाणे, " मनुष्य हा जात्याच स्वतंत्र आहे ", म्हणून त्याला स्वतंत्रपणे जगण्याचा हक्क आहे, अर्थात या निसर्गवादाचा उदय हा तत्कालीन समाज परिस्थितीतील दोषांचे निर्मूलन करण्याच्या उमेदीनेच झालेला पहावयास मिळतो• समाजातील कृत्रिम भेदभाव, अन्याय, जुलूम यांच्यावर कडक टीका करून जीन जॅक्स रूसो ने समाजात स्वातंत्र्य, बंधुत्व व ममत्व ही मूल्ये असली पाहिजेत असे प्रतिपादन केले• निसर्गवादी स्वातंत्र्य, निसर्गप्रेम, परव्यक्ती आदर, समायोजनक्षमता, प्रयत्नवाद, समुहजीवन संवर्धन, सौंदर्याभिरुची यासारख्या मूल्यांचे आचरण करताना दिसतात• निसर्गवादींनी नैतिक जीवनाकडे कमी लक्ष देऊन " स्वातंत्र्य " मूल्यावर अधिक लक्ष केंद्रीत केले तरी त्यांनी व्यक्ती म्हणून माणसाला दिलेले महत्त्व असामान्यसाधारण आहे• त्यांच्या तत्वज्ञानाचा इत्यर्थ मानवी कल्याण हाच ठरतो• म्हणून त्यांचे तत्वज्ञानही मूल्य शोधनाच्या विकासातील महत्वाचा असा टप्पा ठरते•

## कार्यवादाची मूल्यविषयक भूमिका :

वर्तमानाला अवाजवी महत्व देऊन अनुभव हाच श्रेष्ठतम गुरु असे मानणाऱ्या कार्यवादांनी जीवनाच्या शाश्वत मूल्यांचा विचार केलेला नसला तरी त्यांनी मानव जातीच्या कर्तृत्वाला दिलेले महत्व अनन्यसाधारण असे आहे. अर्थात या कार्यवादातून " अनुभव प्रामाण्य " हे मूल्य मानव-जातीला जसे प्राप्त झाले आहे तसेच अनुभवाला प्रमाण मानण्यासाठी अनुभव घेणे गरजेचे झाले, आणि या गरजेतूनच " प्रयोगशीलता " हे मूल्य हाती आले. विचार कृतीत उतरल्यानंतरच तो सार्थक होतो. अशी स्पष्ट भूमिका असल्याने " कृतीशीलता " या मूल्याला महत्व आले. तसेच बुद्धीनिष्ठा आणि बुद्धीनिष्ठ आशावाद ही मूल्ये देखील मानवी समाजात रुजावयास कारणीभूत झाली. " अखंड उद्योगप्रियता " आणि " अखंड जागरूकता " या अनुभववादी ( कार्यवादी ) लोकांची महत्वाची मूल्ये ठरली. कर्तृत्ववान माणसे समाजाला खरे वळण लावू शकतात याची खात्री झाल्याने श्रेष्ठ माणसांचा आदर समाजात मान्यता प्राप्त झाला. आदर्श हा कुठे आध्यात्मात किंवा निसर्गात शोधावयाचा नसल्याने वर्तनातील हेतू आणि कृतीतील चांगलेपण हेच जीवन सार्थकी लावण्याचे महत्वाचे अंग ठरले. त्यामुळे स्वावलंबनाला महत्व प्राप्त झाले. स्वयं-शिक्षण व स्वयं शिस्तीला महत्व प्राप्त झाले.

## वास्तववादाची मूल्यविषयक भूमिका :

वास्तववाद्यांनी जगाच्या मागे निश्चित यंत्रणा आहे हे मान्य करून जगव्यवहाराच्या कार्यकारणभावाचा शोध घेण्याच्या चालवलेल्या अखंड यत्नातून " ज्ञानसाधना " हे मूल्य लाभले आहे. भूतकाळातील आणि

वर्तमानकाळातील विश्वसनीय माणसांनी शोधलेली मूल्ये स्वीकारायला वास्तववाद्यांची हरकत नसल्याने " ज्येष्ठादर " आणि इतिहास व संस्कृती आदर ही मूल्ये देखील मानवी समाजाला प्राप्त झाली आहेत. आचरणातील पवित्रपणालाच वास्तववादी महत्वाचे स्थान देत असल्याने प्रेम, सहानुभूती, बंधुत्व, आत्मसंयमन, दूरदर्शीपणा या मूल्यांची त्यांना सामाजिक स्वास्थ्यासाठी आवश्यकता भासते.

## अस्तित्ववादाची मूल्यविषयक भूमिका :

अस्तित्ववादाचा उगमच मुळी भौतिक प्रगतीने धारण केलेल्या मानवी संहारकतेच्या अगतिकतेतून झाला आहे. मनुष्याचे " व्यक्तित्व " हे सर्वोच्च आहे ही अस्तित्ववाद्यांची भूमिका आहे. पहिल्या व दुसऱ्या महायुद्धाच्या विध्वंसी पार्श्वभूमीला विरोध म्हणून अस्तित्ववाद उदयाला आला आहे. म्हणूनच वस्तुनिष्ठतेपेक्षा " आत्मनिष्ठा " या मूल्याला तो प्राधान्य देतो. विज्ञान युगाने निर्माण केलेल्या समस्यातून माणसाची सोडवणूक करण्याची मनिषा अस्तित्ववाद बाळगून आहे. अस्तित्व केवळ जगणे नसून मनुष्याचे जीवन समृद्ध, कलाशाली, आत्मजागृत व प्रगतीकारक होणे असे अस्तित्ववादाला वाटते. म्हणून व्यक्तीची अभिरुची संपन्नता व विवेकनिष्ठा ही त्यांना आदराची बाब वाटते.

अस्तित्वाचे स्वरूप मानवी बुद्धीला न पटणारे असल्याने ते श्रद्धेनेच समजून घ्यावे लागते असे मत ते मांडतात. त्यामुळे " श्रद्धा " या मूल्यांची पुन:स्थापना अस्तित्ववादी करू इच्छितात. त्यासाठीच त्यांना नैतिक व धार्मिक शिक्षणाची जरूरी वाटते. अशेच " मानवता " मानवजाती मध्ये रूजविण्यासाठी मानव्यशास्त्रांचे विषय अध्यापनात आणले जावेत असे त्यांना वाटते.[११]

**मूल्यसंक्रमण व शिक्षकाची भूमिका :**

मूल्यसंक्रमण म्हणजे सुसंस्कार रूजविणे, म्हणजेच सद्वर्तनी व्यक्तिमत्व घडविणे असा अर्थ होतो. सद्वर्तनी व्यक्ती घडविण्यासाठी तिची मानसिकता अभ्यासावी लागते. कोणतीही व्यक्ती ही निसर्गापत्य असल्याने अनेक ब-या वाईट सहजप्रवृत्तींचा कंद असते. अनेक सहजप्रवृत्ती तिच्यामध्ये वसत असतात. तिच्या अंतर्मनात जी सहजप्रवृत्ती ज्या पध्दतीने अधिराज्य गाजविण्याचा प्रयत्न करते त्यावरून तिचे वर्तन घडण्याची शक्यता असते. सहजप्रवृत्तींना योग्य दिशा देणे आणि वळण लावणे हा मूल्य संक्रमणातील महत्वाचा टप्पा ठरतो.

मूल्य ही संकल्पना अमूर्त आहे. तिचे संक्रमण एका सजीव असणा-या व्यक्तीमध्ये करायचे असते. त्यामुळे मूल्यसंक्रमण करणा-या शिक्षकाला, व्यक्तीला संयमशीलता बाळगावी लागते. आत्मविश्वास बाळगायला हवा. मूल्यसंक्रमणाच्या ध्येयावर अढळ निष्ठा ठेवावी लागते. तरच मूल्यसंक्रमणात यशस्वीता लाभेल.

विद्यार्थ्यांमध्ये मूल्यसंक्रमण करू इच्छिणा-या अध्यापकामध्ये परिश्रमशीलता, संयमशिलत्व आणि दूरदृष्टी या मूल्यांची आत्यंतिक गरज आहे. सहजप्रवृत्तींना योग्य दिशा आणि वळण लावण्यासाठी मूल्यांना अनुसरून अनेक अनुभवांची मालिका विद्यार्थ्यांच्या समोर ठेवावी लागते. आणि हे काम जाणीवपूर्वक सातत्याने करावे लागते. सवयीचे रूपांतर व्यक्तिमत्वातील स्थायीभावामध्ये झाले आणि वर्तनामध्ये कायम स्वरूपी प्रामाणिकपणा, सचोटी, निःस्वार्थीवृत्ती इ. स्थिरभावरूप धारण करून प्रतिबिंबित होऊ लागला की, मग मूल्यसंक्रमण झाले असे आपल्याला म्हणता

येते. शिक्षकांच्या आचरणातून कांही मूल्यांचे संक्रमण होते. याची त्यांना जाणीव हवी.

व्यक्तीचे जीवन मूल्यांनी युक्त बनवायचे असेल तर ती जबाबदारी शिक्षणाची आहे. कारण शिक्षणाद्वारेच विशिष्ठ प्रकारची मूल्ये व्यक्तीमध्ये रुजवावी लागतात. ही मूल्ये व्यक्तीमध्ये शिक्षणातून रुजविताना त्यामध्ये मातृभाषेचा सिंहाचा वाटा असतो, कारण मातृभाषा हेच व्यक्तीचे ज्ञानग्रहण करण्याचे प्रमुख साधन आहे. जीवनमूल्यांचा स्वीकार प्रभावीपणे होण्यासाठी मातृभाषेचे अध्यापन प्रभावी होण्याची गरज आहे. मातृभाषेचे अध्यापन प्रभावीपणे करावयाचे म्हणजेच मातृभाषेच्या पाठ्यांश, पाठांचा आशय प्रभावीपणे विद्यार्थ्यांत संक्रमित करावयाचा म्हणजेच विशिष्ठ तऱ्हेच्या मूल्यांचे प्रभावी अध्यापन करणे होय. त्यामुळे मूल्यांचे अध्यापन प्रभावी कसे करता येईल याचा विचार करणे क्रमप्राप्त आहे.

२.४ <u>मूल्यांचे अध्यापन</u> :

मूल्य म्हणजे काय , मूल्यांचे संक्रमण करता येते हे पाहिल्यावर मूल्याध्यापनाविषयी विचार करणे क्रमप्राप्त आहे. सर्व प्रथम तत्वज्ञानाचे आणि मानसशास्त्राचे कांही पंथ यांचा मूल्या बाबत दृष्टिकोण कोणत्या आहे याचा उहापोह करू.

आदर्शवादी तत्ववेत्त्यांच्या मते मुलांमध्ये ज्ञान, आणि मूल्ये बीजरूपाने सुप्तावस्थेत असतात. तर आपण त्याचा शोध घेऊन विकास करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. वर्तनवादी मानसशास्त्रींच्या मते विद्यार्थ्यांमध्ये सुप्तस्वरूपात ज्ञान, गुण व मूल्ये नसतात; तर नियंत्रित

प्रतिसादास आवश्यक असणा-या अगदी प्राथमिक अवस्थेतील शक्यता किंवा संभाव्यता असतात. वर्तनवादी मानसशास्त्राचा प्रणेता वॅटसन यांच्या मते तर शिक्षकाला विद्यार्थ्याला घडवावेसे वाटते तसे घडविता येते. यावरून असे अनुमान काढता येईल की, सर्व प्रकारचे गुण आणि मूल्ये वर्तन नियंत्रित करण्याच्या सुयोग्य पद्धतींचा अवलंब केल्यास शिकविता येतात.

गेस्टाल्ट मानसशास्त्राच्या मते मनुष्य मार्यामध्ये एखादी गोष्ट पूर्णत्वाने पाहण्याची आणि तदनुरुप वर्तन करण्याची मूलगामी, सहज, अनाकलनीय प्रवृत्ती असते. त्यामुळे या पंथाच्या मानसशास्त्राच्या मते एखाद्या गोष्टीकडे (मूल्यांसह) समग्रतेने पाहण्याच्या पद्धतीचा वा पद्धतींचा प्रभावी वापर करून मूल्यारोपण करता येईल.

शालेय अभ्यासक्रमातून मानवी जीवनमूल्यांचे शिक्षण दिले जाते. शिक्षण म्हणजेच इष्ट व सुयोग्य दिशेने घडवून आणलेला विकास, आपल्या सांस्कृतिकदृष्टया बहुविध असणा-या समाजात, सर्वसामान्य जनतेत ऐक्य व पूर्णत्व येण्यासाठी शिक्षणाने वैश्विक व शाश्वत मूल्यांना उत्तेजन दिले पाहिजे.

जे समुहाचे हित करते ते साहित्य, भाषा साहित्यात मानवी भाव भावना, सुख-दुख, व्यथा आणि कथा असतात. मानव कोणत्याही देशातील असो सारख्याच असतात. त्यांच्या अभिव्यक्तीचे स्वरूप फारतर कमी अधिक प्रमाणात बदलेल. त्यामुळे साहित्य हे मानवा मानवामध्ये जवळीकता निर्माण करण्याचे प्रभावी साधन आहे. भाषाविषयाच्या अध्यापनातून अनेक प्रकारची जीवनमूल्ये विकसित करता येतील. सुशिक्षित

व सुसंस्कृत माणसाचे लक्षण म्हणजे रसिकता व रसिकतेचा आधार म्हणजे सौंदर्यदृष्टीचा विकास भाषाविषयाच्या अध्यापनातून अशी वृत्ती निर्माण झाली पाहिजे व ही करण्याची जबाबदारी शिक्षकांची असल्याने आपणास मूल्याध्यापनाचा विचार करणे अगत्याचे आहे. म्हणजेच मूल्यांच्या अध्ययन अध्यापनाला अत्यंत महत्व आहे आणि म्हणून शिक्षण प्रक्रियेला मूल्य शिक्षणाच्या संदर्भात विचार करताना, " मूल्यांचे ज्ञान " हे शिक्षणाचे प्राथमिक कार्य सर्वस्तरावर असावे.

मूल्यांच्या अध्यापनासंबंधी विचार करताना एक गोष्ट आपल्या प्रामुख्याने लक्षात येते ती म्हणजे व्यक्तीला केवळ मूल्यांचे ज्ञान, माहिती असून चालत नाही. तर ती मूल्ये वर्तनामध्ये प्रतिबिंबित झाली पाहिजेत. व्यक्तिने त्याचा स्वीकार केला पाहिजे. तर ती व्यक्ती मूल्यानीयुक्त आहे असे म्हणता येईल. **" Values are not taught but caught"** असे मूल्य अध्यापनाच्या संदर्भात म्हटले जाते. याचाच अर्थ मूल्यांच्या संदर्भात त्यांच्या कृतीस अधिक महत्त्व आहे हे आपल्याला दिसून येते.

कवितेच्या अध्यापनाविषयी असे एक विधान केले जाते की, **"Poetry is caught and not taught"** कवितेचे ( म्हणजेच कवितेतील भावाचा किंवा काव्यानुभवाचे) अध्यापन करता येत नाही, तो पकडावा लागतो. ज्याप्रमाणे वातावरणाचा प्रभावाने व्यक्तीला सर्दी, पडसे वा इतर रोगाचा प्रादुर्भाव होतो, तद्दत वातावरणातूनच मूल्यांचे संक्रमण , आरोपण होत असते. याचा अर्थ उघड आहे की, आपल्याला मूल्यारोपण करताना पोषक असे वातावरण शाळेत, शाळेच्या परिसरात, घरी व दारी असणे आवश्यक आहे. मूल्यारोपनाच्या बाबतीत राममूर्ती अहवालामध्ये पूर्वावश्यक अट सांगितलेली आहे. ती

पुढील प्रमाणे :-

'Value education should become an integral part of the entire educational process and school climate.'

विविध पाठ्य घटकातून प्रतिबिंबित होणा-या मूल्यांचे संस्कार जेंव्हा शिक्षक अध्यापनाद्वारे विद्यार्थ्यांवर करत असतो त्यावेळी त्यांना मूल्यांचे किलपत ज्ञान झाले हया पेक्षा त्यांच्यामध्ये मूल्ये किती प्रमाणात संक्रमित झाली ? ज्या मूल्यांचे संस्कार विद्यार्थ्यांवर जाणीवपूर्वक केले गेले त्यांचा स्वीकार त्यांच्याकडून झाला का ? वर्तनामध्ये त्यांचे प्रतिबिंब पहावयास मिळते की ? या बाबी अत्यंत महत्वाच्या आहेत. त्यामुळे इतर विषयांचे अध्यापन आणि मूल्य अध्यापन करताना शिक्षकास प्रामुख्याने वरील बाबींची योग्य कल्पना, जाणीव असणे आवश्यक आहे.

ज्ञान, आकलनाच्या बाबत ज्या पद्धती आहेत त्या पद्धती व मूल्य आकलन करण्याच्या पद्धती यात फरक असला पाहिजे. जसे तत्वज्ञान चर्चेतून शिकवता येते. पण पोहणे शिकवायचे असेल तर आपल्याला प्रवाहात पडल्याशिवाय शिकता येणार नाही म्हणून मूल्य शिक्षणाबाबत अध्यापन पद्धती सुचविताना अत्यंत जागरूक व सतर्कतेने अत्यंत योग्य अशी मूल्य शिक्षणपद्धती निवडावी लागते. वास्तविकरित्या सध्याच्या अभ्यासक्रमात मूल्यशिक्षण हा स्वतंत्र विषय नाही. त्यामुळे त्याच्यासाठी वेळापत्रकामध्ये स्वतंत्र तासिका दिलेल्या नसतात. शिक्षकांना याची जाणीव हवी की, प्रत्येक शालेय विषयामध्ये मूल्ये आहेत आणि ती मूल्ये रूजविण्यासाठी पाठ्यघटकाचे अध्यापन करतांना विद्यार्थ्यांमध्ये कशी संक्रमित होतात हा मूलभूत दृष्टिकोन समजून घेतला पाहिजे, विद्यार्थी मूल्ये किती प्रमाणात कृतीत आणतो, याला महत्व आहे. येथे विद्यार्थ्यांच्या वर्तनाचे मूल्यमापन

आवश्यक असते.

चांगल्या मूल्यशिक्षणाच्या अध्यापनामध्ये पाठ्य घटकाचा दृष्टिकोन, शिक्षकाने पुरविलेले दाखले, शैक्षणिक साधने, अध्यापन पद्धती यांचा समावेश होतो. विद्यार्थ्यांची आकलन क्षमता, त्यांची प्रवृत्ती या गोष्टीही तितक्याच महत्वाच्या आहेत. कुटुंब व सामाजिक वातावरण यावर विद्यार्थ्यांना मूल्य स्वीकृतीसाठी उद्युक्त करण्याची क्षमता अवलंबून असते. मूल्यशिक्षणासाठी अनुकूल सामाजिक व सांस्कृतिक वातावरण, आदर्श शिक्षक व परिवर्तनशील विद्यार्थी या आवश्यक गोष्टी आहेत. थोडक्यात मूल्ये रुजविणे व त्यांचे संवर्धन करणे ही प्रक्रिया शिक्षणाने व्यक्तीच्या ज्ञानात्मक, भावात्मक व क्रियात्मक अशा तिन्ही क्षेत्रात घडवून आणली पाहिजे. अध्यापन करताना अथवा विविध उपक्रमाचे आयोजन करताना ते उपक्रम का राबवावयाचे याचे ज्ञान विद्यार्थ्यांना करून दिले पाहिजे. त्या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये कोणती मूल्ये रुजवावयाची याची शिक्षकांना निश्चित कल्पना हवी. उपक्रमाचे मर्म समजले तरच ते उपक्रमात अंत:करणापासून हृदय ओतून सहभागी होऊन ते उपक्रम यशस्वी करू शकेल. मर्म न जाणता पार पाडलेले उपक्रम मंत्र हरवलेल्या तंत्र स्वरूपातील कर्मकांडाप्रमाणे होते.

मूल्य शिक्षण अधिक प्रभावी व परिणाम कारक होण्यासाठी मूल लहान असते तोपर्यंत त्याला इष्ट वळण लावण्यातील प्रयत्न यशस्वी होतात. बालकावर त्याच्या कुटुंबातील परिसरातील, सर्व व्यवहाराचे प्रत्येक क्षणी संस्कार होत असतात. त्याकरिता मुलांवर संस्काराची सतत धार राहील इकडे कुटुंबातील व्यक्ती, शिक्षक, समाजातील व्यक्ती यांनी लक्ष दिले पाहिजे. मुलांच्या सहजप्रवृत्तीचा लाभ मूल्यसंवर्धनासाठी कसा

करून द्यावा याचाही शिक्षकाचा अभ्यास असला पाहिजे. कौतुकपूर्ण उद्गारांना विद्यार्थी भरघोस प्रतिसाद देतो. त्यामुळे मूल्य रुजवण्यास याचाही उपयोग होवू शकतो. किशोर वयातील मुलांची प्रकृती गटवार काम करण्याची असते. याचा त्याची सहकार्यवृत्ती वाढविण्यास वापर करून घेता येईल. मुलांना आज्ञा देत असताना होकारार्थी द्याव्यात. उदा. बागेतील फुले तोडू नका अशी नकारात्मक आज्ञा देण्यापेक्षा बागेतील फुले तोडल्यास बागेचे सौंदर्य कमी होईल अशी आज्ञा द्यावी.

मुलांच्यावर संस्कार समजुतीने करायला हवेत. शिक्षेने नव्हे, ज्या मूल्यांचे संवर्धन आपण बालक, किशोर, कुमार यांचेमध्ये करू इच्छितो त्या मूल्यानुसार आपण तसे वागण्यास सांगतो. म्हणून ते वागतील पण हे केवळ आपल्यावरील विश्वास यामुळे घडेल. पण पुढे त्यांची विचार करण्याची शक्ती काम करू लागली म्हणजे असेच का वागायचे ? असेच का करावयाचे ? असे प्रश्न त्यांना पडू लागतील अशावेळी आपल्यावरील विश्वास त्यांना नैतिक मूल्यवर्तनावर स्थिर ठेवण्यास अपुरा पडेल. पण तो स्वत: विवेकशक्तीचा उपयोग करून शिक्षकांनी सुचविलेले, सांगितलेले मूल्य वर्तन योग्य आहे या निर्णयाला स्वत:च्या विवेकशक्तीचा उपयोग करून आपणहून आला पाहिजे. अशी आपली मूल्य शिक्षणाची अध्यापन पद्धती हवी.

बुद्धिवाद्यांना एखादी गोष्ट बौद्धिकरित्या पटली तरी त्या मूल्यानुसार ते वागतातच असे नाही. सर्व बुद्धिवादी बुद्धिनिष्ठ नसतात.[१२] याचाच अर्थ बुद्धिला जे पटेल तसे ते वागतातच असे नाही. म्हणून विद्यार्थी बुद्धिनिष्ठ होण्याकरता धैर्य, साहस, निर्भयता, त्याग आदी गुणांची जोड असावी लागते. तेंव्हा मूल्य शिक्षण देत असताना अशा काही मौलिक गुणांचे

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

संवर्धन सहज होईल एकडेही शिक्षकांनी लक्ष देणे आवश्यक आहे.

मूल्य शिक्षणामध्ये अधिकाराचा वापर शिक्षकांनी करू नये. कारण त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये धाकामुळे मूल्य स्विकृती घडते. पण हे वागणे नकारात्मक असते. मूल्यसंक्रमण विद्यार्थ्यांच्या अंत:प्रेरणेने व्हायला हवे. त्याची विवेकशक्ती जागृत केली पाहिजे. प्रत्येक विद्यार्थ्यांनि आपल्या बोलण्या, वागण्याच्या वेळी आपल्या सद्सद्विवेक बुद्धीचा कौल मागावा, अशी सवय लावली पाहिजे. मूल्यशिक्षण देतांना हेच धोरण शिक्षकांनी अवलंबीले पाहिजे. विद्यार्थ्यांना मनन, चिंतनाची सवय लावली पाहिजे. चिंतनाने व अनुभवाने वृत्ती पालटते. चिंतनाने ग्रहण केलेली मूल्ये दृढ होतात. त्यामुळे विद्यार्थी मूल्यांनी युक्त बनतो.

मूल्यशिक्षण प्रभावी होण्यासाठी अध्यापन प्रभावी हवे, पाठनियोजन काळजीपूर्वक केले पाहिजे. विद्यार्थ्यांना मूल्य शिक्षणाकरिता संधी मिळेल अशा प्रकारची परिस्थिती, सोयी व साहित्य पुरविले पाहिजे. मूल्यांचे आरोपण करण्यासाठी मूल्य रूजवण्यास उपयुक्त ठरणा-या पाठातील विशिष्ट भागाकडे वासलक्ष पुरविले पाहिजे. नुसते मूल्यांबाबत कथन करण्यापेक्षा छोटया गोष्टी, उदाहरणे, प्रसंगरूपाने अथवा दृक-श्राव्य साधनाच्या मदतीने हे कार्य करता आले तर ते अधिक परिणामकारक होईल.

शिक्षकाचे नीतिमुक्त वर्तन मूल्ये रूजवण्यामध्ये विद्यार्थ्यांना अधिक प्रेरित करतील. याच बरोबर समवयस्क गट यांचाही फार मोठा वाटा आहे. आकाशवाणी, दूरदर्शन, रेडीओ, जाहिरात, नियतकालिके इत्यादी अनौपचारिक प्रसार माध्यमातूनही मूल्याचे संक्रमण करता येते. प्रौढशिक्षण

संस्कार केंद्र इ. अनौपचारिक संस्थामधून चारित्र्य घडवण्याकरता विशिष्ट कार्यक्रम आखले गेले पाहिजेत.

मूल्यांचा स्वीकार विद्यार्थ्यांकडून होणे गरजेचे असल्याने मूल्यांचे अध्यापन करतांना ते ऐतिहासिक, पौराणिक कथा, लोककथा, सुभाषिते, म्हणी इत्यादी विविध उदाहरणे, दाखले, प्रसंग यांच्या सहाय्याने मूल्यांचे अध्यापन करणे आवश्यक आहे. कारण मूल्य स्विकृती-नंतर व्यक्तीचे वर्तन कसे असते ? तिच्या वर्तनात नेमका कोणता बदल होतो ? याचे दृश्यरूप कथांच्या उदाहरणांच्या सहाय्याने विद्यार्थ्यांसमोर उभे करता येते. मूल्य शिक्षणाच्या दृष्टीने " आदर्श " म्हणजे नेमके कसे ? याची स्पष्ट कल्पना, जाणीव, उदाहरणे, दाखले , कथा यांच्या साहाय्याने देता येतात.

## २.५ समारोप :

प्रस्तुत प्रकरणामध्ये मूल्य म्हणजे काय ? त्याचा अर्थ, मूल्य शिक्षणाबाबत विविध तज्ञांची मते कोणती आहेत ? मूल्यांचे मानवी जीवनातील स्थान व महत्त्व कोणते ? तत्वज्ञानाच्या विविध संप्रदाया-मध्ये मूल्य शिक्षणाची भूमिका कोणती सांगितलेली आहे ? मूल्य व शिक्षण यांचा परस्पर संबंध कसा आहे ? मूल्यसंक्रमणामध्ये शिक्षकाची भूमिका कोणती असावी ? मूल्यांचे अध्यापन कसे करता येईल ? मूल्य शिक्षणामध्ये अनौपचारिक शिक्षणाची भूमिका कोणती ? इत्यादी बाबींचा उहापोह केलेला आहे. या प्रकरणाचा प्रस्तुत संशोधनास पार्श्वभूमी सारखा उपयोग होणार आहे.

=0=0=0=0=0=

सं द र्भ :

१. जोशी लक्ष्मणशास्त्री : मराठी विश्वकोष खंड ११
(मुंबई= महाराष्ट्र विश्वकोष निर्मिती मंडळ,
१९८७ पृष्ठ-८८९,८९०.

२. सहस्त्रबुद्धे दि.ह. : शिक्षणातून नैतिक मूल्यसंवर्धन
(पुणे = साधना प्रकाशन, प्र.आ.१९८४)
पृष्ठ - २७.

३. G. Terry page and J. B. Thomas with A.R.Marshall, International Dictionary of Education, London : The English Language Book Society and Kogan Page. 1979.

४. लीला पाटील(संपादक) : " मूल्यशिक्षण " विशेषांक, कोल्हापूर.
श्री महाराणी ताराबाई अध्यापक महाविद्यालय,
सुवर्ण महोत्सवी प्रकाशन,१९८४, लेख.लीला
पाटील- मूल्य शोधन व मूल्यसंवर्धन परिशिष्ट-१
पृष्ठ - ४

५. एन.सी.ई.आर.टी. - व्हॅल्यूज अँड स्कूल
(नवी दिल्ली : एन.सी.ई.आर.टी.प्रकाशन
वर्ष नाही) पृष्ठ - १.

६. डॉ.देवस्थळी रा.भा. : विद्यार्थी मित्रांनो
(कोल्हापूर- सन्मित्र प्रकाशन,१९८९) पृष्ठ-१२

७· धीरेंद्र वर्मा, व्रजेश्वर वर्मा, धर्मवीर भारती, रामस्वरूप चतुर्वेदी, रघुवंश : हिंदी साहित्य कोष भाग-१ (वाराणसी : ज्ञान मंडळ लि·, वसंत पंचमी संवत २२०२० द्वि·आ·) पान ६५४·

८· शिक्षक मार्गदर्शक व्यापक कार्यक्रम - संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे जून, १९८८ पृष्ठ -५३·

९· Gandhi K.L. : Value Education, A Study of public opinion. New Delhi 1993 Gyan Publishing house page 8/9.

१०· डॉ·देवस्थळी रा·भा· : विद्यार्थी मित्रानो, कोल्हापूर सन्मित्र प्रकाशन, १९८९ पृष्ठ - १८,१९

११· डॉ·पारसनीस न·रा· : शिक्षणाची तात्विक व सामाजशास्त्रीय भूमिका पुणे - नुतन प्रकाशन १९८७ पृष्ठ नं·११३

१२· सहस्त्रबुध्दे दि·ह· : शिक्षणातुन नैतिक मूल्यसंवर्धन ( पुणे = साधना प्रकाशन, प्र·आ·१९८४) पृष्ठ क्र· ५३-५४·

=0=0=0=0=0=